# तीस तीन फुलें

म. ग्रं. सं. ठाणें.
विषय
सं. नं.

लेखक—
वैजनाथ लक्ष्मण पेंडसे

म. ग्रं. सं. ठाणे
य १५
. क्र. ७८८२
१२६०




REFBK-0017962
REFBK-0017962

नाथ लक्ष्मण पेंडसे

याच लेखकाचें

# बहुरंगी बुडबुडे !

हें विविध विषयांवरील

सुरस गोष्टींचें पुस्तक

लवकरच

**प्रसिद्ध होईल.**

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. काव्य नं.
ता.
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# तीस तीन फुले

REFBK-0017962
REFBK-0017962

# तीस तीन फुलें

( निवडक कवितांचा संग्रह )

लेखकः—

वैजनाथ लक्ष्मण पेंडसे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्र०
अनुक्रम ...... दि: ......
क्रमांक ...... नों: दि: ......

प्रस्तावनाकार:—

विनायक लक्ष्मण बरवे, बी. ए., एल् एल्. बी.

किंमत आठ आणे

प्रकाशकः—
**दामोदर सांवळाराम आणि मंडळी,**
ठाकुरद्वार, मुंबई, नं २

या पुस्तकासंबंधानें सर्व हक्क लेखकाकडे आहेत.

मुद्रकः—
**नरहरी माधवराव यंदे.**
इंदुप्रकाश प्रेस, ३८०, मुंबई, नं. २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...८०५३... वि... 
क्रमांक ...९८८... नों दि...

# प्रस्तावना

कविता लिहून लिहून तुंबल्या कीं प्रकाशक गाठण्याकरतां कवि बाहेर पडलाच म्हणून समजावें. प्रकाशक हातीं आला नाहींच तर स्वतःचा खिसा प्रकाशकाच्या हातीं द्यायचा व मग प्रस्तावनेकरतां संशोधन करायचें. प्रस्तावनेच्या लटांबराखेरीज ग्रंथसृष्टींत प्रवेश करायला नवशिका लेखक बहुशः तयार नसतो. जन्मापासून मरणाअखेर, कोणत्याहि प्रकारच्या मानवी प्रवासाला कोणीना कोणीतरी पोंचवायला हा लागतोच व पोहंच करण्याचा शिष्टाचारहि पण आहेच. मात्र या सहकारी लोकांना भलभलत्या अडचणी सहन कराव्या लागतात. वैभवशाली प्रवाशाबरोबर जाणाऱ्याला त्या प्रवाशाइतकेंच क्वचित् वैभव प्राप्त होत असतें. पण असले प्रसंग सोडले तर रुष्टतेचें आतिथ्य प्रथम सहकाऱ्याच्याच वाटणीला येण्याचे प्रसंग फार! आधींच कवितेचें आतिथ्य विनाकळकळीचें; त्यांत अगदींच नव्या कवीचें पुस्तक आजच्या दुष्काळांत जसा काय चालू आषाढासारखा झोंड महिना! नव्या नव्या कवितांच्या पुस्तकांनीं सतावून गेलेले वाचक असल्या प्रसंगीं जी उदासीन वृत्ति धारण करतील तिचा पहिला कडवटपणा प्रस्तावनाकाराला गिळून टाकावा लागतो. गहजब झाला तर पहिला ठोका प्रस्तावनाकाराच्या माथीं. आणि तोंहि खरेंच, अनवश्यक पाहुण्याला गृहस्थाश्रम्याचें घर दाखवावेंच कां एखाद्यानें? पण पाहुणा हा प्रस्तावनाकाराच्या जिव्हाळ्याचा असेल तर—?

शिवाय लेखनांतल्या कित्येक गोडधोड उपभोगांप्रमाणें हाहि एक गोड भोग आहे. कुठल्याशा एका गोड गळयाच्या पक्ष्याला म्हणे कांव्यानें अंग ओरबडलें गेल्याशिवाय चांगलें गाणेंच सुचत नाहीं. लेखक, कवि, चित्रकार आदिकरून कलासक्त प्राण्यांचेंहि पण तसेंच असतें. पंखांना वारें देण्याकरतां प्रथम धडपडायचें, धडपडत धडपडत दुसऱ्या तसल्याच प्राण्याच्या जवळपास जायचें, त्याच्याकडून प्रथम स्वांगावर ओरखडून घ्यायचें व मग त्याच्यासह स्तिमित आकाशांत मिळेल त्या अनुभवासाठीं भरारी मारायची. प्रस्तुत "**तीस तीन फुलें**" हीही एक अशाच स्वरुपांतील, जिवंत होऊन कलासक्त होण्याची नैसर्गिक हालचाल आहे. असली नैसर्गिक हालचाल काबूंत ठेवण्याचें वाचकाप्रमाणेंच प्रस्तावनाकाराच्याहि हातीं नसतें. काव्य–प्रदेशांतला अनुभवच असा आहे कीं वाचकांच्या औदासिन्यामुळें कवितेचा ओघ मुळींच थांबण्यासारखा नाहीं अगर प्रस्तावनाकारांच्या शैथिल्यामुळें नव्या कवींची उचल जिरण्यासारखी लाजाळू नसते.

पूर्वकालीन संस्कृत कवींच्या हेतूवरून मम्मटानें "काव्यं यशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये" अशी एक कारिका ग्रथित केली. त्याच कारिकेचा ओचा धरून आमच्यांतील पूर्व मराठी कवींनीं दुडदुड धांव घेतली.

**कवि सत्काव्यें लिहुनि मिळविती थोर यश, मान्यते**
**शारदादेवी करि मान्य तें;**

प्रस्तुत कवींना हाच अनुभव आला. मात्र ते स्वतःची ओळख ठेवून स्पष्ट म्हणत आहेत,

**जरि प्रतिभा न वसे जन्म-जात मानसीं**
**तिज आळवावया उचित यत्न साहसी**
**पद-सेवा करितां प्रसन्न होइ न कशी ?**
**शारदा–कृपा संपादाया तीस तीन मम फुलें**
**अर्पितों करुनि काव्य–वन खुलें !**

शारदा-कृपा संपादण्यासाठीं पद-सेवा करण्याची शिस्त जितकी जुनी, तितकीच प्रस्तुत कवीची काव्यपद्धतिहि जुनी आहे. विसाव्या शतकांतील लोकांच्या अवलोकनाकरतां सतराव्या शतकांतील खेड्याची जशी हुबेहुब प्रतिमा उभारावी ( बिहार-धरणीकंपांतील निराश्रितांना मदत मिळविण्यासाठीं उभारलेल्या H. O. H. Fete प्रमाणें ) तद्वत्च प्रस्तुत कवींनीं आपल्या पुस्तकाच्या नांवापासून तों थेट शेवटच्या पानापर्यंत आंतील कवितांची मांडणी, विचारांचा ओघ, भाषेची पद्धति, वृत्तांचा अवलंब, अगर विषयांची निवड सर्व कांहीं जुन्यांत जुनें असें थाटलें आहे. नवाईच्या अहमहमिकेनें वाचकाच्या तोंडाला मळमळ सुटणें अगदीं स्वाभाविक आहे, अशा स्थितींत जुन्यांतल्या जुन्या मधाचें एखादें बोट आवश्यक नाहीं असें कोण म्हणेल ? मळमळ तर नाहींशी होईलच; पण वर जुन्या मधाची गोडी काय असते हेंहि नव्यानें कळून येईल.

कांहीं उद्वेगाचे उद्रेक सोडल्यास प्रस्तुत कवितेंत इथून तिथून प्रशांत घरगुती व साधेसुधेपणानें सजलेलें असें पवित्र वातावरण भरलेलें आहे. जुन्या कवितेचे सारे गूण यांतील प्रत्येक कवितेंत आढळतात. कांहीं कवितांमधील श्रृंगार तर इतका मुग्ध आहे कीं, आवतीं भोंवतीं समजदार मुलें घेऊन वाटेल त्यावेळीं हें पुस्तक खुशाल वाचीत बसावें. श्रृंगाररसात्मक अशा दोनच कविता मात्र बहारदार आहेत. 'दीप-विसर्जन' या कवितेंतील शेवटचा चरण साधाच आहे पण त्यानंतरचा न लिहिलेला श्रृंगार फार फार मधुर व मोहक आहे यांत बिलकूल शंका नाहीं. 'विरह-पूर्ति' या कवितेंतहि विरह-श्रृंगार चांगला नटला आहे. कवींच्या तारुण्याचा विचार केला तर त्या मानानें प्रस्तुत पुस्तकांत 'भावना' बरीच कमी आहे असें कित्येक वाचक कदाचित् म्हणतील. पण जुन्या कवितेची ती एक मोहक बाजू आहे. भावनावादापेक्षां बोधवादाकडे ती जास्त झुकलेली असायची. वामनादि व्युत्पन्न

कवींचा तर सारा भर काय तो बोधवादावरच ! मराठी क्रमिक पुस्तकांतून त्यांची पुरेपूर रेलचेल आढळून येते. बोधवादात्मक कविता प्रस्तुत कवि तर इतकी उत्तम लिहितात कीं,

'हें माझें' 'मम मित्र' 'आप्त निज हे' सौख्यांत भासे खरें
आपत्कालिं कळे जगीं असति का कोणी सगेसोयरे
.................................................................
.................................................................

अगर

सौख्यामागुनि दुःख—क्लेश सरतां आनंद वाटे जनां
.................................................................
'देणें वा दुखणें कुणास न रुचे !' हें बोलती लौकिकीं
व्हाया अक्षय तत्व-लाभ, धरण्या त्यां सिद्ध मी मस्तकीं!

अथवा **'दगडाचें देवपण'** या कवितेंतील कित्येक शार्दूलविक्रीडितें वामनपंडित अगर तत्सम कवीनेंच लिहिलीं आहेत कीं काय असाच क्षणभर अचंबा वाटेल ! मराठी शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनीं, मराठी ट्रेन्ड शिक्षकांनीं अगर आपल्या भाषणांत सुभाषितें वा अर्थांतरन्यास यांचा सर्रास उपयोग करूं इच्छिणाऱ्या सुभाषित बहाद्दरांनीं वरीलसारख्या ओळी अवश्य पाठ कराव्या. जुनीच दारू पण नव्या बाटलींत भरण्याची पद्धत अलीकडील व्यापारशास्त्राला फारच मानवली आहे. तद्वत्‌च मराठी क्रमिक पुस्तकांत घालण्यासाठीं जुन्या बाण्याची व जुन्या लेण्यांची पण नव्यानें अवतरलेली कविता जर कुणाला पाहिजे असेल तर ती या पुस्तकांत खात्रीनें सांपडेल. क्रमिक पुस्तकांचे व्यापार-व्यवहार करवणारे नियामक सद्‌गृहस्थ या संग्रहाकडे आपोआप वेधले जातील असा आम्हांस भरंवसा आहे.

प्रस्तुत संग्रहांतील कोणतीहि ओळ घेतली तरी त्यांत वृत्तदर्पणीय अशी एकहि चूक आढळणार नाहीं. दिसनव्या जन्मास येणाऱ्या पुस्तकांच्या मानानें या संग्रहांतील हा विशेष कौतुकास्पद नाहीं असें कोण म्हणेल ? कित्येक चुका असूनहि एखादी रंगेल कविता अत्यंत आकर्षक

१८८२ ३/८/५०

वाटतें, पण ती कसोटी नव्या कवितेची झाली. जुन्या कसोटीप्रमाणें बिनचूक, वृत्तबद्ध व प्रौढ भाषेनें सजलेली कविता ही आकर्षकच ठरत आलेली आहे.

प्रस्तुत कवीवर—क्वचित् **'कोंकण'** व **'पहिला पाऊस'** या कवितेसारख्या कविता सोडल्यास—कोणाहि विद्यमान कवीची छाया पडलेली नाहीं. प्रस्तुत संग्रहांत इंग्रजी कवितेचा कसलाहि रंगढंग नाहीं. उसनवारी नाहीं, कलेचें अनुकरण नाहीं, अगर कल्पनांची, शब्दांची अगर विषयांची उचलेगिरीहि नाहीं. वर्षानुवर्ष काम करणारी कविता—साधन कमेटी एखाद्या अधिकारी माणसानें खुशाल नेमावी ! कित्येक वर्षें काम करूनहि त्या कमेटीला आमूलाग्र कोराच रिपोर्ट प्रसिद्ध करावा लागेल. अठराव्या शतकाच्या अखेरीस कवि Chatterton यानें आर्ष पद्धतीच्या पण उत्कृष्ट कविता Rowley Poems या नांवानें प्रसिद्ध करून इंग्रजी वाङ्मयाच्या नव्या जमान्यांत खळबळ उडवून दिली. मराठी कवितेच्या आजच्या नव-जीवनांत हा संग्रह कांहीसा तशाच स्वरुपाचा आहे. कवितेचे नवे नवे ओघ, नव्या कल्पना, नवे विषय, नवीन मांडणी, नवीन घटणा, अगर नवें वातावरण यांपैकीं आपणावर कसलाहि परिणाम न होऊं देतां एका विशिष्ट पद्धतीनें आपलें काव्य सजवून वाचकांसमोर मांडायचें यांत कवि Chatterton प्रमाणेंच प्रस्तुत सुबुद्ध व महत्वाकांक्षी कवीचें खास व्यक्तिवैशिष्ट्य आहे यांत तिळप्राय शंका नाहीं. मात्र आपलें हें व्यक्तिवैशिष्ट्य या संग्रहापुरतेंच मर्यादित न ठेवतां काव्याच्या शिल्लक राहिलेल्या ९० टक्के प्रदेशांत प्रस्तुत कवि पुढील काळांत भरपूर व्यक्त करतील अशी आम्हांस दृढ आशा आहे. परिस्थितीनें खणून ठेवलेल्या खंदकावरून पल्याड होऊन या डोंगरमाथ्यावरून त्या पर्वतश्रेणीकडे धाव घेतल्याशिवाय, पूर्व क्षितिजावरून पश्चिम क्षितिजावर नजर स्थिर केल्याशिवाय, हँगिंगगार्डनपेक्षां किनइ घाटातील बेफान काव्य—कांतारांत बैठक मारल्याशिवाय अगर सरकारी इमारती वगळून गरिबागुरिबांच्या झोंपडींत

प्रवेश केल्यावांचून, मजुरांच्या वस्तींत रहावा केल्यावांचून, अव्यक्त राहिलेली कविता, कोणाहि कवीकडून खास खास लिहिली जाणार नाहीं. चंडोल हा बेदिक्कत, अमर्याद व निःशंकपणाचा नमुना आहे. कवि-प्रकृतीची ध्येय-प्रतिमा जर कोणी असेल तर ती चंडोल. कवीनें चंडोलाचीच प्रतिकृती बनल्यावांचून त्याच्या हातून असामान्य चंडोल गीतांची निर्मिती होणार नाहीं. ज्ञाताच्या कुंपणावरून अज्ञाताकडे चला एवढेंच प्रस्तुत कवि-मित्रांना सुचवून मी आटोपतें घेतों.

चिपळूण,
ता. १९।६।३४.

विनायक लक्ष्मण बरवे

---

सं. ... नं. ...
ता. ...
ठा. ने.

# फुलें फुलल्यावर—

'**तीस तीन फुलें**' म्हणजे गेल्या बाराचौदा वर्षांत लिहिलेल्या कवितांपैकीं निवडक अशा तेहतीस कवितांचा संग्रह व तीस तीन फुलांचीच निवड करण्याचें प्रयोजन केवळ अधिक आषाढाची आलेली पर्वणी ! हीं ' रान–फुलें ' समजूनच त्यांचा संग्रहरूपी गुच्छ मी वाचकांच्या हातीं देण्याचें धाडस करीत आहें. त्यांतील चार फुलें इंग्रजी भाषेच्या कलमाचीं असून बाकींचीं शुद्ध स्वरूपाचीं अतएव स्वतंत्र आहेत. या रान-फुलांतीलच कांहीं फुलें रसिकांस सुवासिक अगर आकर्षक वाटल्यास मनाच्या समाधानाला तेवढीच जागा !

आपल्या कवितांचें एक छोटेंसें पुस्तक प्रसिद्ध करण्याचा विचार माझे मनांत बरेच दिवस घोळत होता. पण त्याला इतक्या लवकर मूर्त स्वरूप येण्याचें कारण माझ्या एका बहुश्रुत कवि–मित्रांचा माझ्या विषयींचा अहेतुक जिव्हाळा व त्यामुळें त्यांनीं वेळोवेळीं दिलेली चालना ! नाम-निर्देश करण्याची त्यांची परवानगी नसली, तरी पुस्तक-प्रकाशनासाठीं त्यांनीं प्रथमपासून शेवटपर्यंत जी निरपेक्ष मदत केली, त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानणें अगत्याचें आहे.

' रघुकुल-कथामंजरी'कार श्री. गोविंद विनायक देवस्थळी, एम्. ए., बी. टी., झाला वेदांत प्राइझ–मन्, यांनीं व माझे उदयोन्मुख कवि-मित्र व शाहीर बाल–सुहृद उर्फ भास्कर घनश्याम बेलवलकर यांनीं कवितांची हस्तलिखित प्रत लक्षपूर्वक वाचून ज्या कित्येक मार्मिक सूचना केल्या, त्याबद्दल, श्री. सुंदरराव भास्करराव वैद्य, एल. एम्. ई., यांनीं मुख–पृष्ठावरील सुंदर चित्र काढून दिल्याबद्दल व मेसर्स डी. बी. नेरॉय आणि कंपनी यांनीं त्याचा ब्लॉक तयार करून दिल्याबद्दल आणि इतर अनेक मित्रांच्या साहाय्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

या संग्रहांतील बऱ्याचशा कविता मनोरंजन, यशवंत, नवजीवन, प्राविण्य, स्त्री, स्फूर्ति, पारिजात वगैरे मासिकांतून व केसरी, विविध–

वृत्त, श्री-लोकमान्य इत्यादि वर्तमानपत्रांतून पूर्वीं वेळोवेळीं प्रसिद्ध झाल्या असून त्या या पुस्तकांत त्या त्या संपादकांनीं पुनर्मुद्रित करण्यास उदार अंतःकरणानें परवानगी दिली, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. चित्रकार जसा आपल्या चित्रावर शेवटचा कुंचला मारून तें रसिकांच्या पुढें ठेवतो, त्याप्रमाणें कित्येक कविता प्रसिद्ध झाल्यावरही त्या या पुस्तकांत संकलित करतांना त्यांमध्यें किरकोळ फेरफार अगर शब्द-रचनेंत केलेला बदल मार्मिक वाचकांचे लक्षांत येईलच.

जागतिक मंदीच्या काळांतही माझ्यासारख्या सामान्य व अनोळखी मनुष्याचें पुस्तक—आणि तेंही कवितेचें—मला विशेष सवलत देऊन मन-पसंत छापून दिलें, याबद्दल श्री. दामोदरशेट यंदे यांचा मी ऋणी आहें.

माझ्या पहिल्या कवितेपासून मला आपलेपणानें प्रोत्साहन देणारे महाराष्ट्राचे आवडते कवि व वाङ्मय—क्षेत्राच्या निरनिराळ्या दालनांत अधिकार-पदानें संचार करणारे प्रथित-यश लेखक व नाटकाकर श्री. 'आनंद' उर्फ विनायक लक्ष्मण बरवे, बी. ए., एल्. एल्. बी., यांनीं सुंदर प्रस्तावना लिहून माझ्यासारख्या साधारण माणसाबद्दल आपुलकीनें कळकळ व्यक्त केली, याबद्दल मी त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतों.

ज्यांच्या उदार अंतःकरणामुळें मला थोडें फार शिक्षण लाभून चार अक्षरें लिहितां आलीं, त्या माझ्या मातुलांची—कै० ती० बळवंतराव देव-धर यांची—मला या प्रसंगीं आठवण झाल्याखेरीज कशी राहील ! त्यांच्या अमूल्य उपकारांची अंशतः फेड म्हणून नव्हे, तर त्यांच्याबद्दल वाट-णाऱ्या उत्कट आदराचें अल्पसें स्मारक म्हणून हीं फुललेलीं फुलें मी त्यांच्याच चरणीं अर्पण करीत आहें.

शेवटीं ज्या शारदादेवीच्या कृपेनें पुस्तक—प्रकाशनाचा योग जुळून आला तिला सद्भावानें वंदन करून, पुस्तकांतील राहिल्या साहिल्या दोषां-बद्दल वाचकांची क्षमा मागून तूर्त त्यांची रजा घेतों.

झावबाची वाडी, **मुंबई**
ता० २५ जून १९३४

रसिकांचा नम्र,
**वै० ल० पेंडसे**

# अनुक्रमणिका


| क्रमांक | कवितेचें नांव | पृष्ठांक |
|---|---|---|
| १ | लो० टिळकांचें स्वर्गारोहण ... ... | १ |
| २ | मृत्यु वरा स्वातंत्र्याभावीं— ... ... | ३ |
| ३ | शुद्ध द्वितीयेच्या चंद्रास— ... ... | ७ |
| ४ | कां भर टाकूं सवति–मत्सरा ? ... ... | १० |
| ५ | ममत्व लटकें सांगे जनांतें कवी ! ... ... | १२ |
| ६ | सृष्टिसुंदरीचा साज ... ... ... | १४ |
| ७ | विरस कसा झाला ? ... ... ... | १७ |
| ८ | मातृ–प्रेम ... ... ... ... | १९ |
| ९ | सद्भाग्य ... ... ... ... | २२ |
| १० | स्वतंत्र वन–निर्झरा ! ... ... ... | २३ |
| ११ | स्मृति–सौख्य ! ... ... ... | २५ |
| १२ | जगाची व्याप्ति ! ... ... ... | २६ |
| १३ | ऊठ भारता ! ... ... ... | २८ |
| १४ | अरासिक ! ... ... ... ... | २९ |
| १५ | मीलन ! ... ... ... ... | ३० |
| १६ | दिवंगत मातुलास– ... ... ... | ३२ |

| | | |
|---|---|---|
| १७ | हा शुद्ध वेडेपणा ! | ३६ |
| १८ | दीपावली ! | ३७ |
| १९ | पदवीधर गुलाम ! | ३८ |
| २० | नोकरी ! | ४० |
| २१ | दीप–विसर्जन ! | ४२ |
| २२ | पहिला पाऊस ! | ४५ |
| २३ | अनुकरण | ४७ |
| २४ | वाळूचा देव ! | ४८ |
| २५ | माझा ताप ! | ५० |
| २६ | पत्र आलें, पण— | ५२ |
| २७ | कला–पूर्ति ! | ५४ |
| २८ | कोंकण ! | ५६ |
| २९ | विरह–पूर्ति ! | ५८ |
| ३० | अट्टाहास ! | ५९ |
| ३१ | दे० विठ्ठलभाई पटेल यांस— | ६० |
| ३२ | तत्त्वनिष्ठा ! | ६१ |
| ३३ | दगडाचें देवपण ! | ६२ |

ती० बळवंतराव उर्फ नरहर केशव देवधर.



जन्म, १७ जून १८९० ]  [ अवसान, १५ मार्च १९३०

नश्वर तव तनु नष्ट जहाली पंचमहाभूतिं तीं

परि हृदीं नांदे अक्षय स्मृति ! (पृ० ३४)

मातुलास—

विद्या, पालन पितृतुल्य मम तूं
केलें तया ना तुला

विश्वासा भगिनी-सुतीं धरुनियां
संतोषसी मातुला ! ।

झाला अंत अकाल—हेतु तव ते
ना पूर्ण झाले कदा

लाभो सद्गति तूज—काव्य-कुसुमां
मी वाहतों त्वत्पदां ! ॥

—वैजनाथ

# शारदा-चरणीं—

काव्य लिहावें, मनीं वाटलें – साहित्या जमवुनी
बैसलों लेखन करण्या झणीं,

घटका घटका विचार करुनी शब्द एकहि न जुळे
त्यामुळें हृदय तदा तळमळे,

गरुडासम कवि काव्याकाशीं विहार करिती सुखें
त्यां न मी पतंग स्पर्धूं शकें,

कवि सत्काव्यें लिहुनि मिळविती थोर यशा, मान्यते
शारदा देवी करि मान्य तें ;

जरि प्रतिभा न वसे जन्म-जात मानसीं
तिज आळवावया उचित यत्न साहसी
पद-सेवा करितां प्रसन्न होइ न कशी ?
शारदा-कृपा संपादाया **तीस तीन** मम फुलें
अर्पितों करुनि काव्य-वन खुलें ! ॥

नोंद क्र. ७०७०
ता.
१५८५

श्री

# तीस तीन फुलें

## १ लो० टिळकांचें स्वर्गारोहण (शा. वि.)

ज्यानें हाल असंख्य सोसुनि जनीं सत्कार्य आरंभिलें
भूमातेसि जयें स्वराज्य मिळण्या कष्टां बहू सोशिलें
ज्यानें नश्वर देह अंतिं अपुला ठेवूनि स्वर्गीं पहा—
केला वास, दिसे न तो पुनरपी—दुर्दैव देशा महा !

नाहीं ज्यास अम्हीं कधींच नयनीं प्रत्यक्ष हो पाहिलें
नाहीं भाषण तें रसाळ कधिंही कानीं अम्हीं ऐकिलें
नाहीं दैवत दीर्घ आयु दिधण्या आम्हीं तया पूजिलें
गेला सोडुनियां अम्हां सतत कीं दु:खार्णवीं टाकिलें !

मृत्यू-वृत्त असह्य ऐकुनि झणीं राष्ट्रांतले लोकही—
दु:खानें वदती ' हिरा हरपला—गेला खरा धाकही !'
आत्म्या दे पुढती तया सतत तूं शांती अगा ईश्वरा !
आर्यावर्त अतां निराश्रित गमे—आधार गेला खरा !

कारावासहि सोशिला—जणुं तया केलें तयें मंदिर
गीतेचेंहि रहस्य काढुनि यशा संपादिलें सत्वर
'माझा हक्क स्वराज्य' मंत्र दिधला, सन्मार्ग दावी स्वयें
पावे अक्षय कीर्ति, नश्वर जगा सोडूनि स्वर्गीं निघे !

केले कष्ट बहू परी सुफल त्यां लाधे न,—ना साहवे
ओष्ठीं सयश-अमृता धरियलें—काला न तें पाहवे !
गेली राष्ट्र-विभूति, – भारत गमे चंद्राविणें अंबर
पावे विस्मरणा न हिंद-जनता शोकाकुला सत्वर !

* * *

( व. ति. )

ती काल-रात्र गमली प्रलयांतरींची
झांकी मुखा शशि, गिळी तम सृष्टि साची
आक्रंदुनी रडति मेघ, असह्य दुःखें—
वेडावली भरत-भूमि सुपुत्र—शोकें ! !

२ ऑगस्ट १९२०

## २ मृत्यु बरा स्वातंत्र्याभावीं— ( चंद्रकांत )

*Time was when I was free as air*
*The thistle's downy seed my fare,*
*My drink the morning dew.*

—Cowper.

—१—

" वायुपरी स्वच्छंद विहारीं भूमितलीं, गगनीं
सरिता भूवरि, जलद नभीं, वा मृगेंद्र जेविं वनीं

उंच भराऱ्या कधिं उड्डाणें अनंत आकाशीं
गानीं स्पर्धा मंजुळ नादें कधिं गंधर्वांशीं

अरुण देखुनी स्वागत रविचें करण्या मधुर रवें
न एक दिनही अंतर पडलें त्याच्या सत्सेवे

नाना कंटक-वृक्ष-फलें मधु कठीण मृदु भक्षीं
निर्मल जल सेवुनि मम बालां आनंदें रक्षीं

घात-पात अन्याचा अरिचा स्वप्नींहि न ठावा
'हिंसक वृत्ति न ग्राह्य प्रभुला' मन धरि या भावा

अशा सुखानें स्वतंत्रतेनें काळ जाइ वेगें
पूर्वपुण्य मम उदया आलें वाटे शुभयोगें

छे ! तसें न; आनंदापाठीं दैव करी कावे
सूर्यास्तीं तम क्षितिज-फटींतुनि जैसा डोंकावे !

अशुभ लक्षणें होती नाना वाटे भ्रम जडला
मनीं कुशंका येउनि सांगति, ' सौख्य—काल सरला !'

तरंग मनिंचे सत्यचि ठरले ! निष्ठुर अधमानें
येउनि आमिष दावुनि नेलें अम्हां बंधनानें

कारागारीं वियोग करि मम तान्ह्या बाळांचा
कैशी गत ही साहूं ? वदण्या मज न अतां वाचा—

पूर्वजन्मिचें वैर साधण्या अरि जणुं अवतरला
वा हें शासन योग्यचि लावी परमेश्वर मजला ?

मित्रानेंही पाठ फिरविली, अम्मल तिमिराचा
शशि न उदेला,—जणुं परवाना नीचांच्या नाचा !

भयाण झाली निशा सुचवि जणुं स्वतंत्रता खुटली
परवशता 'आ' पसरुनि भिववी, ना कोणी वाली

घोर स्तब्धता श्वासोच्छ्वासा विरोध करि वाटे
मृत्यु बरा स्वातंत्र्याभावीं ! दास्य-दुःख मोठें !! ”

—२—

भयाण रजनी सौम्य रूप धारि, मुक्ति-समय सुचवी
पराधीनते विसरुनि क्षण ती मोदें रविसि स्तवी

धन्य धन्य प्रतिपळ तें ! बंदिंहि स्वर्ग-सौख्य चाखे
हाय ! परी जों भानावरि ये निज पंजर देखे

द्विगुणित झालें दुःख तियेसी मरणाहुनि मरण
मूर्च्छित पडली दुःखातिशयें वा कारण अन्य ?

मूक मंदमति खगहि न साहे परवशतेस जरी
सर्वश्रेष्ठ मग मानव कैसा साहिल जन्मभरी ?

कष्टार्जित बरि मीठभाकरी, नको तूप परुचें
खाट बरी निजसत्तेची, मृदु पर-शय्या न रुचे

पर-दास्याचे चाखिशि चटके--व्याधि पीडि, मनुजा !
परि न उमजशी, मूक गांजिशी—जैसा व्याघ्र अजा !

असो; न सेवी अन्न-पया ती--स्वातंत्र्यीं नयन
साधु लीन हो जैसा प्रभु-पदिं करुनी संयमन

स्मरे वन-सुखा, पुन्हां पंजरा देखुनि हो कष्टी
शोकातिशयें भान न तीतें, पडे देहयष्टी

उठे झडकरी स्फूर्ति ये, दिसे तीस बंदिशाळा
हताश होउनि म्हणे, "न साधन वांचविण्या बाळां

सिद्ध असें मी मरणा—परि मम बालें ताराया
पदरीं टाकूं कवणाच्या परवशता टाळाया ?

प्रभूवांचूनी अन्य न कोणी त्यांतें रक्षाया
तोचि दयाघन सुबुद्धि देइल मृदुपाणिं वागाया

अनन्यभावें परमेशाचें चिन्तन दे सुगती
मम छकुल्यांना तारिल ईश्वर त्या देउनि सुमती."

अच्युतावरी भार टाकुनी होई सद्गदित
येइ उमाळा क्षणिं त्या दाबुनि सद्भावें स्तवित

मस्तक नमुनी तल्लिन झाली, देहा विस्मरली
स्वतंत्रता-सुख चाखी आत्मा,—कुडी झणीं पडली !!

एप्रील १९२२

---

## ३ शुद्ध द्वितीयेच्या चंद्रास— ( गीति )

जाउनि तव सखयाला शीत-करा ! एक जाहली घटिका
हास्य-वदन कां न दिसे? रमणीवरि धरिसि राग कां लटिका ?

विसरुनि तापा कान्ता प्रेमें बहु सृष्टिसुन्दरी धाली
परि तूं उदास कैसा ? तुजविण तिजला नसे कुणी वाली !

उधळी तारा-पुष्पां, गुलाल-लाली दिसे मनोहारी
पाश्चिम-दिग्भालीं जणुं ल्याली कुंकुम पहा तुझी नारी !

स्वप्रेम-हार अर्पण करण्या उत्सुक दिसे तदीय मन
औदासीन्या टाकुनि लावें तमाला करावया गमन

हा जन-समूह दर्शन-तत्पर तव पाद वंदि सद्भावें
दो दिन दर्शन न दिलें, कोप असा कां मनीं न मज ठावें !

जीर्ण-वस्त्र-गुण देउनि नूतनसें कोणि इच्छि हव्यासें
तव दीन दशा देखुनि स्वार्थी धरणें न इष्ट तव दासें !

तूं भानु-मित्र म्हणविसि, ऐसा निस्तेज आजि कां दिससी ?
कवणें तुज गांजियलें ? रवि-सत्संगासि कीं गमे मुकसी ?

कां कृश रूप तव दिसे ? मोहक सौन्दर्य हरियलें कवणें ?
राहूनें वा तिमिरें ? कीं तेजा मुकसि व्यर्थ हरुनि पणें ?

दैवाची पूर्ण कृपा तुजवरि, परि तें अजी कसें उलटे ?
अवमानिलें कुणी तुज ? कीं प्रिय-जन-दु:ख दु:सहचि वाटे ?

प्रेमाचा जणुं पुतळा जनक असा लाभला तुज स्वभावें
लक्ष्मी ऐशी भगिनी, सद्बंधु कितीक, स्नेह भानुसवें

चालक चलाचलाचा भगिनी-भर्ता तुला वश विलोकीं
भ्राता अमृत-सेवुनि ज्या होती मर्त्य अमर स्वर्लोकीं !

लावण्यखनी रमणी तुज दैवें रोहिणी वरी राया
आतुर कितिक वराया, कितिक उभ्या नटुनि माळ अर्पाया !

असतां इतुका प्रेमी आप्त-गण, असा उदास कां न कळे ?
'जगिं कोणी न कुणाचा' म्हण वाटे सत्य ही अशा वेळे !

कृशतर तव तनु हो, परि क्षिति न कुणा अर्धमासपर्यंत
जो तो निज-हित-तत्पर !–व्यसनीं पडल्या न दे कुणी हात !

मिरविति सहोदर तुझे–अमृत धन्वंतरी–अमर-लोकीं
क्षयमुक्त त्यां न करवे तुज? तव कीर्ति न रुचे तयांला कीं ?

प्रखर रवीचा अनुचर, असंख्य अनुचर तुझे निशा-नाथा !
पारि म्लान दिससि, वाटे पावसि जणुं रमाणि-रूप-तन्मयता !

‘ गुरुपत्न्यभिलाष धरी ’ परछिद्रान्वेषि दोष तुज देती
स्मरुनि उणें तव देवा ! कैशी स्वर्गीं मला मिळेल गती ?

राग न धरिं वचनाचा, हिणवायाचा मनीं नसे हेतु
तूं थोर !—राग धरिशिल दासावरि मानसीं न हा किंतु

वर्षुनि स्वकर-सुधा पर-हित-दक्षाचि धन्य तूं कला-नाथा
आश्वासी ईश तुला, ‘प्रतिदिनिं उत्कर्ष पावसी आतां !’

श्रेष्ठांचा श्रेष्ठपणा वर्णावा दीन बालकें कैसा ?
तव पद-सेवा होवो आस मनीं हीच आपुल्या दासा !

सन्मान्या, सत्संगा, शीत–करा, अब्धिजा, निशा-नाथा
कमलानुजा, सुकुलजा, रवि-मित्रा ! दावीं अर्भका सुपथा.

नोव्हेंबर १९२३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम............ दि: ............
............ नों: दि: ............

## ४ कां भर टाकूं सवति-मत्सरा ? ( पादाकुलक )

मिचकावुनि कां नयन चंद्रिके । यत्न करिसि भुलवाया मातें ?
तव प्रेमा क्षय-वृद्धिस पावे । सदा कलंकित तव तनु नटवे !

नेत्र-कटाक्षीं जादु भरलिसे । प्रेमाची खनि रमणी भासे
अखंड प्रेमा सांडुनि कैसा । चंचलतेनें रमवुं मानसा ?

गुलाब-कलिके ! तुजला मोहुनि । जवळ कराया आस ये मनीं
परि तव कंटक टोंचुनि हातीं । रसिक जनांचें रुधिर प्राशिती !

लज्जित ललना-कपोलिं सुन्दर । गुलाब बहरति कोमल सत्वर
सुवास घ्याया मुभा, न कंटक । अर्पाया मज ती अति उत्सुक !

सुधे निष्ठुरे ! तव हव्यासें । अमर झगडले दैत्यांसंगें
विष-सहजनिते ! तुझी थोरवी । स्वर्लोकाविण कोणी गावी ?

सुधा वसे—ना कलह-प्रिय परि—। मम प्रियेच्या अखंड अधरीं
मंथन कपटहि नको लाधण्या । मदालसा मज उदार देण्या !

वृक्ष—शिखेवरि बसुनि कोकिळे ! । सुरवें कां मज गुंगविसि खुळे ?
गान, समय स्वेच्छेचा भलता । निज बाळांची चाड न चित्ता

मातृ—प्रेमा असति पारखी । भूल मको तव,—श्रेष्ठ मत्सखी !
मम रमणीचें गीत मनोहर । मधु तेणें भरलें हृन्मंदिर !

चांदणि, कलिके, सुधे, कोकिले ! । श्रेष्ठ मत्प्रिया सद्गुण-मोलें.
सकलहि तुमचे गुण हृदिं घेउनि । अवतरली जणुं सद्गुण-खाणी !

दृष्टि न फेंका मम रमणीवरि । पडेल तुमची दृष्ट तियेवरि
मी तरि तुम्हां देउनि थारा । कां भर टाकूं सवति–मत्सरा ?

जानेवारी १९२४

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. काव्य नं.
ता.
ठाणें.
मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणें.

## ५ ममत्व लटकें सांगे जनांतें कवी ! ( शा. वि. )

जो तो मग्न दिसे पहा जन सदा कार्यीं करीं घेतल्या
चाखाया मकरंद लोलुप अली पद्मीं जलीं जन्मल्या
कोणी गुप्तपणें स्वकार्य करण्या जाती स्थलीं निर्जनीं
देखे सूक्ष्मपणें तयां कवि, जरी कोणी न त्या लोचनीं !

संकेत स्थलिं जाति मित्र अवघे संकल्प जे सांगण्या
एकान्तीं जरि युग्म प्रेम वदलें तें ना कळे शाहण्या
सान्त्वाया मन आपुलें कुणि निघे रम्य स्थला पाहुनी
तेथेंही कवि जाउनि गुपित जें सांगे जनां गाउनी !

कोणी जाइ निसर्गसिद्ध बघण्या रम्य स्थलीं देवता
कोणी मानव-जात पुष्प-वाटिका, कोणी वना, पर्वता
कोणी निर्झर, आपगा, तरु, लता, दूरस्थलीं सागरीं
तेथेंही कवि सिद्ध—श्रीहरि जसा काष्ठीं जलीं अंबरीं !

माता-तात सुतासवें मृदु वचें बोले जरी बोबडें
कीं भ्राता-भगिनी परस्पर वदे खेळामधें भावडें
प्रद्युम्नास्त्र-सुविद्ध मुग्ध युवती प्रेमें वदे वल्लभा
ऐकाया कवि तें समर्थ, कवितें गुंफावया त्या मुभा !

पक्षी गाति सुरम्य गान मुकया कैसें अकर्णा कळे ?
शोभा माधविंची जगद्रमणिची अंधा कशी आकळे ?
कस्तूरी जरि लाभली सुख अजा–पाळास कैचें तिनें ?
काव्यें निर्मुनि स्थान योग्य कवि दे सर्वां स्वयंस्फूर्तिनें !

निद्रादेवि-पदीं समस्त जनता पावे सुखें लीनता
स्वप्नीं भोगि कुणी नृपासन, दुजा वाटे धरी दीनता
ते आचार्य विनम्र श्रीपति-पदीं होती तपाराधनीं
कैसा जागृत सर्वदा कवि ?–वसे श्रीशारदा तन्मनीं !

देई स्फूर्ति सदा कवीस लिहिण्या ती शारदा देवता
राहे अंतरिं सिद्ध, शब्द सुचवी, नाहीं कधीं न्यूनता
वाटे जें बरवें तियेस लिहिवी हातें कवीच्या, परी–
'मी हें निर्मियलें !'–ममत्व लटकें सांगे जनांतें कवी !

मे १९२४

---

## ६ सृष्टिसुंदरीचा साज (स्वर्गंगा)

उत्तररात्रीं जागृत झालों अवचित, वाटे भ्रम चित्ता
मनीं कल्पना येती नाना—त्यांवर कैंची मम सत्ता !

परी वाटलें सहल कराया जावें प्रशांत त्या काळीं
लगेच तैसा सिद्ध होउनी निघें—कोण हो मज टाळी ?

अंधकार-रिपु सृष्टी गिळितां भय बहु वाटे मम हृदया
रम्य गम्य मुळिं लेश दिसेना—चकिताचि झालों त्या समया

कितितरि वेळां याच ठिकाणीं मन रमवाया मी आलों
सृष्टिदेविचे खेळ देखुनी गुंगुनि भाना विस्मरलों !

सौन्दर्याचा अखंड खजिना कुण्या तस्करें लुटियेला
किंवा नेणुनि ठिकाण चुकलों ?—भ्रांति पडे मम चित्ताला !

स्तंभित होउनि जरा निरखितां प्रकाश अंधुकसा भासे
धीर वाटला, आशा आली—नेत्र लागले त्याच दिशे

चित्र-लेखिका चतुर देवता रंग-पात्र घेउनी करीं
कौशल्याचा धरुनि कुंचला वाटे नाना रंग भरी !

जसा चितारी धोपट रेषा काढुनि पुशितो पुन्हां पुन्हां
तसें देवता कारि न कधीं ती—रेखिव रेखी हा बाणा !

चित्र काढुनी अस्पष्टचि, मग रंग भरी बहु कौशल्यें
कोण्या रंगा उणीव न मुळीं—अमित-निधी ती गुणी स्वयें !

चित्र रेखण्या वेळ तरि किती !—रंगहि द्याया बहु घाई
सूर्योदय-समयीं संपवुनी, झडकरि अदृश्याचि होई.

प्रतिदिनिं ऐसा सराव परि त्या खंड न ठावा तिज चुकुनी
धन्य धन्य ती चतुर देवता—प्रणाम माझा तच्चरणीं !

तमासुराची नित्य जांचणी सृष्टिदेविच्या सौन्दर्या
मातिस मिळवी अखिल सुरूपा—कुरूप त्यातें दुष्कृत्यां !

कृष्ण-पटल पसरी सर्वांवरि—चराचर जगा धाक पडे
तद्भीतीनें आश्रय पाहुनि जो तो अपुल्या गृहीं दडे !

अनुचर त्याचे निशाचर अशा समयिं हिंडती स्वैरपणें
धन्य तयांची—धन्यचि कसली—स्वभाव बनतो संगतिनें !

सविता दावी आरक्तमुखा—न रुचे त्यांना तद्यश तें
परी गांजले तमासुरानें तेच नाचती बहु मोदें !

सृष्टिसुन्दरी प्रेमें नटुनी उभी स्वागता दिन-नाथा !
प्रेम-कटाक्षा टाकीं तूंही—त्यास्तव तिज अति आतुरता !

प्रेम-कटाक्षें काय होय तें सांगुनि लेखुनि काय कळे ?
ज्यांचा त्यानें अनुभव घेणें——मन ओळखणें प्रेम-बळें !

जून १९२५

---

## ७ विरस कसा झाला ? ( चंद्रकांत )

संध्यासमयीं उडी सागरीं घ्याया रवि सिद्ध–
दिसे, परी रमणीच्या मोहें मन होई विद्ध !

अशाच वेळीं मित्र-युग्म, नर, नारी, युव-युवती
बंधू-भगिनी श्रम-परिहारा सहल सुखें करिती.

झुळुक वायुची स्पर्शचि करितां जन आल्हादूनी
भवचक्राच्या आधि-व्याधी विसरति सहज क्षणीं.

प्रिया वदे, " उद्यानीं जाऊं फिरावया मधुरा !
त्रस्त मनाला तोषवूं,–नको विलंब मम चतुरा ! "

मीहि निघालों फिरावया जों मम रमणी वदली
अर्धांगी ती–परि मी अर्ध्या तिच्याच वचनीं कीं !

तोष धन्यता वाटे चित्ता नाना पुष्प-लता
नाना रंगी मधुर सुगंधी पुष्प-तती दिसतां

हंसरी मोहित गंधित बालिश देखुनि एक कळी
वदे सखी मज, "तोडुनि द्या ती कलिका मजजवळी!"

मनास वाटे कलिका उत्सुक करीं उडी घ्याया
तोडणार तों शब्द निघाले, " मत् तोडो राया ! "

कोण बोललें विस्मय वाटे कलिका-जननी वा
दिक्कालांतुनि शब्द प्रकटले कीं बोले कलिका ?

वदे शिपाई दंड धरोनी, " मालुम नहि तुमकू ?
नहीं तोडना इदर कोइ फुल ! चलो जाव घरकू !"

*   *   *   *

विरमुनि गेलों एका शब्दें, विरस किती झाला ?
कसा? कुणाचा?–रसिक जाणती–नको लिहायाला !

मार्च १९२६

---

## ८ मातृ-प्रेम ( शा. वि.)

साहोनी नवमास कष्ट, दिधलें जन्मा मला या जनीं
खस्ता सोसिसि ज्या असंख्य जननी नाहीं तयां मोजणी
तृष्णा भूक हरावया निशिदिनीं दुग्धामृता पाजिलें
प्रेमें कोमल गाल चुंबुनि मला प्रेमाम्बरें झांकिलें !

मर्दूनी सुकुमार अंग हळदी-तैलें सदा न्हाणिलें
नेत्रां कज्जल, गालबोट करुनी पापी जनां टाळिलें
ओंव्या गावुनि गोडशा निजविलें आंदोलुनी पाळणीं
कल्याणीं झटसी अहर्निश-दुजा चाळा न मत्पालनीं !

होतां अल्पहि काळ आड, वदसी ' गेला कुठें राजस ? '
येतां कानिं रडें मदीय, बघण्या उत्कंठ हो मानस
येतां संकट साह्य दे प्रभु जसा भक्ता सदा सत्वरीं
तैशी तू धरिसी सदा मम हिता उत्कंठता अंतरीं !

लाभे शिक्षण अल्पस्वल्प तुझिया आशीर्वचें माउले !
संतोषें सुख साधिलें, हरि-कृपें दैन्यासि ना मानिलें
प्रेमें वागविलें, अयोग्य करणी नाहीं कधीं साहिली
केलें शासन योग्य, 'ही सुजननी! ' कीर्ती जनीं गाइली.

युक्तायुक्त असारसार जननी ! आचार तूतें कदा–
कोणी शिक्षण देउनी शिकविले ?–हा मान माता-पदा !
ओनामाहि न येत सत्य तुजला, बोधीं परी तूझिया–
विद्यापीठहि तुच्छ ज्ञान-सरिते ! वाटे मना माझिया.

*  *  *  *

धाले नेत्र सुदर्शनें जननिच्या, झाले बहू त्या दिन
पावे विस्मरणा कसा ? निशिदिनीं माते स्मरे मन्मन
माते आप्तगणास सोडुनि वसें दूरस्थला एकला
प्रेमा खंड न,–वाढतें जणुं गमे शुक्लेंदुची सत्कला !

स्वप्नीं देखुनि रम्य मूर्ति कितिदां उल्हासतों, बोलतों
होतों त्वत्पद-नम्र मी, विसरतों दु:खा, सुखा पावतों
प्रेमाचा कर पृष्ठिं लागुनि क्षणीं रोमांच होती उभे–
प्रेमाचे, परि हाय ! स्वप्न लटकें, माते झणीं भेट दे !

पोटाची भरण्या खळी कितितरी सोसूं अतां आपदा ?
सान्त्वाया मज प्रेम-शब्द कुठला या अन्य देशीं सदा ?
होतां मानस त्रस्त अन्न न रुचे, वा शेजही नावडे
ब्रह्मानंदिं बुडें तव स्मरण जों माते ! मनातें घडे !

जैसा मीन जळीं वसे—सतत मी प्रेमोदधीं डुंबतों
कीं पद्मीं रस चाखण्या अलि—तसा ज्ञानामृता सेवितों
गानीं लुब्ध अही—सुबोध वचनीं मानीतसें धन्यता
लोभी रक्षि धना—तशी तव पदीं पावित्र्य–श्री तत्वतां !

माते ! ना उपमा तुझ्या रुचतसे प्रेमासि, निर्लोभ तें
तें निर्व्याज, अचिंत्य, चित्त ममते पावावया लोभतें
मातृ-प्रेम अगाध, मोल न तया—अन्यांसि हा दाखला
यातें तुल्य न अन्य प्रेमचि गमे !—कां वाढवूं या खला !

* * * *

येवो येइ विपत्ति, दैव उलटो, ना पालटो दीनता
ना राजाश्रय सांपडो, न लवही लाभो मना स्वस्थता
होवो आप्त-वियोग, अन्नहि नको सुग्रास मातें कधीं
मातृ-प्रेम मिळो—निदान स्मरणीं मानीन मी सौख्य-धी !

नोव्हेंबर १९२६

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १७९६२

## ९ सद्भाग्य ! (सुनीत)

नेत्रीं हीरक-तेज शुभ्र चमके, चाफेकळी नाक तें
वाटे मौक्तिक-पंक्ति दंत, अधरीं लाली स्वयें रंगते
गालीं शोभतसे गुलाब, विलसे कांती जणूं केतकी
शोभे भृंग-ततीच केश, भ्रुकुटी धन्वाकृती नेटकी !

भालीं कुंकुम रेखिलें, कच-चमू वेणीमधें गुंफुनी
पुष्पें गंधित पर्णयुक्त रचिलीं, अंगीं निळी कंचुकी
देहा भूषविलें अमूल्य वसनें, ल्याली बहू भूषणें-
मुक्ता-रत्न-सुयुक्त सुंदर,-कसें लावण्य तें लेखणें !

वाटे शोभलिसे निसर्गरमणी, स्त्रीरूपिणी पद्मिनी
कीं पूर्णेंदु नभोंगणीं प्रकटला, स्वर्गांगना मोहिनी
ब्रह्यानें रचिली सुरम्य युवती निर्दोष, कीं ये रती
सौंदर्ये नटली, सुहास्य दिसली—बेभान झाली मती !

* * * *

देखोनी क्षण एक दृष्टि दिपली – पावित्र्य संचारलें
बोले, 'भाग्य अतर्क्य ज्यास विधिनें सद्रत्न हें निर्मिलें !'

आक्टोबर १९२८

## १० स्वतंत्र वन-निर्झरा ! ( पृथ्वी )

अहा ! रुचिर गोजिरें पथ चुके सरिद्बालक
कडेवरुनि घे उडी करित केलि स्वाभाविक
प्रमोद मनिं दाटला दुडदुडां पदीं चालतां
मुखें मधुर गातसे चिर स्वतंत्रता चाखतां !

तृषार्त वनदेवता मधुर अमृता प्राशुनी
तृषा हरुनि भूमिला कलश वाहिला ओतुनी
तयेंच चिरजीव होय, न कधीं तया न्यूनता
पया तृषित पांथिका पुरवितां सदा धन्यता !

वनांत तृण शोधि पुण्य-पद धेनु कीं एकली
रवि क्षितिजिं लोपतां त्वरित दुग्ध-धारावली—
पडे नग-तलीं झणीं नव अपत्य-स्नेहामुळें
घडे जनन निर्झरा गमतसे पयें निर्मलें !

भगीरथ-नृपें स्वपूर्वज-सुखार्थ जी शोधिली
शिवें सुर-नदी स्वशीर्षि धरितां पडे भूतलीं
तिचीच दुहिता वनीं धरुनी सान रूपा जलीं
जनीं पतित-क्षालनार्थ सुभगा गमे पातली !

## ९ सद्भाग्य ! ( सुनीत )

नेत्रीं हीरक–तेज शुभ्र चमके, चाफेकळी नाक तें
वाटे मौक्तिक-पंक्ति दंत, अधरीं लाली स्वयें रंगते
गालीं शोभतसे गुलाब, विलसे कांती जणूं केतकी
शोभे भृंग-ततीच केश, भ्रुकुटी धन्वाकृती नेटकी !

भालीं कुंकुम रेखिलें, कच-चमू वेणीमधें गुंफुनी
पुष्पें गंधित पर्णयुक्त रचिलीं, अंगीं निळी कंचुकी
देहा भूषविलें अमूल्य वसनें, ल्याली बहू भूषणें–
मुक्ता-रत्न-सुयुक्त सुंदर,–कसें लावण्य तें लेखणें !

वाटे शोभलिसे निसर्गरमणी, स्त्रीरूपिणी पद्मिनी
कीं पूर्णेंदु नभोंगणीं प्रकटला, स्वर्गांगना मोहिनी
ब्रह्म्यानें रचिली सुरम्य युवती निर्दोष, कीं ये रती
सौंदर्यें नटली, सुहास्य दिसली—बेभान झाली मती !

*    *    *    *

देखोनी क्षण एक दृष्टि दिपली – पावित्र्य संचारलें
बोले, ' भाग्य अतर्क्य ज्यास विधिनें सद्रत्न हें निर्मिलें !'

आक्टोबर १९२८

## १० स्वतंत्र वन-निर्झरा ! (पृथ्वी)

अहा ! रुचिर गोजिरें पथ चुके सरिद्बालक
कडेवरुनि घे उडी करित केलि स्वाभाविक
प्रमोद मनिं दाटला दुडदुडां पदीं चालतां
मुखें मधुर गातसे चिर स्वतंत्रता चाखतां !

तृषार्त वनदेवता मधुर अमृता प्राशुनी
तृषा हरुनि भूमिला कलश वाहिला ओतुनी
तयेंच चिरजीव होय, न कधीं तया न्यूनता
पया तृषित पांथिका पुरवितां सदा धन्यता !

वनांत तृण शोधि पुण्य-पद धेनु कीं एकली
रवि क्षितिजिं लोपतां त्वरित दुग्ध-धारावली—
पडे नग-तलीं झणीं नव अपत्य-स्नेहामुळें
घडे जनन निर्झरा गमतसे पयें निर्मळें !

भगीरथ-नृपें स्वपूर्वज-सुखार्थ जी शोधिली
शिवें सुर-नदी स्वशीर्षि धरितां पडे भूतलीं
तिचीच दुहिता वनीं धरुनी सान रूपा जलीं
जनीं पतित—क्षालनार्थ सुभगा गमे पातली !

शरत्समायिं शीतल-प्रभ सुधांशु पूर्णेंदु कीं
सुधा-रसाचि वर्षुनी अखिल विश्व केलें सुखी !
सुधा-कर रमे – वनांत भुलला वनश्री-शरा
वनींच दडला—गमे प्रकटला रुपेरी झरा !

कसा रसिक दंग होय न अशा गुणी जीवनीं !
मनोहर झरा, अहा ! हृदय गुंगलें गायनीं
स्वतंत्र चिर-जीवनीं सुख किती न त्या कल्पना
कशास जगणें न खंति जरि दास्य वाटे मना !

स्वतंत्र वन-निर्झरा ! तव स्वतंत्रता ब्रीद हें
कधीं न पर-दास्य साहुनि तुवां जिवा रक्षिलें !
जिवंत पय प्राशुनी त्वरित तोडुं या बंधना
मनीं धरुनि भावना वरुं यशास माना धना !

२८ एप्रील १९२९

## ११ स्मृति-सौख्य ! (चंद्रकांत)

*Do not quarrel with each other*
*Little sister, Little brother*
*.........................................................*
*For there'll come a sorry day*
*When you'll be parted from each other*

—*Alice L. Richards*

'दो दिवसांची दुनिया' भगिनी ! दावा कां धरिसी
भावासंगें भांडभांडुनी व्यर्थ वैर करिसी ?

अजाण तो, तूं जाणती, तया सांग सदा सुमती
'प्रेम वाढतें प्रेमानें' म्हण सुज्ञ जनीं वदती;

ताई तूं, तो ताइत तव जणुं, तेढ नको चित्तीं
'बऱ्या बोलण्या काय वेंचतें ?' हृदयिं धरीं उक्ती;

विवाह होतां वियोग होइल प्रेमळ भावाचा
अपशब्द तया बोलुनि कधिंही विटाळीं न वाचा;

सहोदर तुम्ही काळगतीनें होतां दोन दिशां
बालपणींचें 'स्मृति-सौख्य'चि मग चढेल अमित यशा !

३० एप्रील १९२९

---

## १२ जगाची व्याप्ति !

( चंद्रकांत )

*I lived first in a little house,*
*And lived there very well;*
*The world to me was small and round,*
*And made of pale-blue shell.*

..............................

नीलावरणी, गोल, गोजिरें गृह सुंदर खासें
सुखें पहुडलों त्यांत—तेंच जग अखिल मला भासे
बाह्य जगाचा वारा ठावा मला न त्या काळीं
उबवुनि माता प्रेमें मजला सुख-पांखर घाली.

*　　*　　*

कालगतीनें कवच फोडुनी बसलों घरट्यांत
मृदुल पिसांच्या मऊ तृणाच्या—मन रमलें त्यांत
तेंच गमतसे जग—पहिल्याहुनि द्विगुणित कीं झालें
मोठा होतां जगही मोठें—घरटें जग झालें !

*　　*　　*　　*

नवपंखांनीं उडूं लागलों हळुहळु घरव्यांत
वाढे सीमा नव्या जगाची जग होतां ज्ञात
हरित पालवी घरव्याभंवतिल समाविष्ट जगतीं
दसपट वाढे अल्प कालिं जग पावुनि चपल गती!

*    *    *    *

अतां उडतसें चहूं दिशांना व्योमीं वर खालीं
नाना वस्तू देखुनि मम मति कुंठित बहु झाली
अफाट जग हें जिकडे तिकडे अमर्याद पसरे
तयीं अल्पमति दुर्बल कैसा विहंग हा विहरे?

*    *    *    *

अज्ञ मानसीं क्षुद्र कल्पना कूप-मंडुकाची
बाह्य जगाची जाणिव होतां वृत्ति होय साची
'उथळ जळा बहु खळखळ'—अज्ञा ज्ञानाचा ताठा
सुज्ञ म्हणतसे अज्ञ आपणां—तोच खरा मोठा!

२ मे १९२९

## १३ ऊठ भारता ! ( चंद्रकांत )

ऊठ भारता ! पहा चहुंकडे पसरे आनंद
निद्रा कैशी सुचते ? झाली काय नजर-बंद ?

तिमिर पळतसे—अरुण दौडतां नभांगणीं वेगें
'निशा संपली' द्विज-गण-कूजन आल्हादें सांगे !

मांगल्याचा निधि तेजाचा पराक्रमी मित्र
पूर्वदिशेनें दौडत येउनि धरिल कृपा-छत्र !

मधुर पुष्प-तति क्षणांत पसरी सुगंध बहु मोदें
विकसित कमलीं मधुप दंगले मधुतर मकरंदें ;

झुळुक वायुची प्रभात-समयीं नवजीवन भासे
नभीं फांकली प्रभा, वृक्ष-शिरिं हेम-कांति विलसे !

प्रभात प्रसवे कार्यक्षमता वर्षुनि चैतन्या
उत्कर्षाची मूर्ति गमतसे—त्वरित हरिल दैन्या.

ऊठ भारता ! सोडीं निद्रा, त्यजिं चिर आलस्या
दाउनि पौरुष सिद्ध नाशण्या होईं पर-दास्या !

१५ आक्टोबर १९२९

## १४ अरसिक ! ( शा. वि. )

लाधे माणिक कुक्कुटा त्यजि, बका ना मानवे मानस
कस्तूरी प्रिय दर्दुरा न, धरिना मुक्ताफला वायस
कैसा सुस्वर तोषवील बधिरा ? वृद्धा कशी कामिनी ?
घूका तेज प्रदीप्त काय ? न वसे नीती खळाच्या मनीं !

गंगा-स्नान न सूकरा, हिम-कर स्तेनासि कैसा रुचे ?
जाणी इक्षु-रुची न गर्दभ, कसें मिष्टान्न रुग्णा पचे ?
दातृत्वीं सुख लोभिया न, दिसणें सौंदर्य अंधा कसें ?
ज्ञानीं मूर्ख रमेल का ? अरसिका आनंद काव्यीं नसे !

२१ आक्टोबर १९२९

---

## १५ मीलन ! ( दिंडी )

भव्य नीलांबर गालिचा सुरेख
दीप ताऱ्यांचे शोभती असंख्य
शुभ्र झुंबरसम पुंज चांदण्यांचे
वायु स्वच्छंदें गीत गात नाचे !

सखी-कार्यीं जी सौख्य मानि बाला—
प्राचि स्वागत करि उधळुनी गुलाला
रत्न-माणिक-सुम-वृष्टितें कराया
दिसति तत्पर दश दिशा बालिका या !

करुनि शृंगारा रजनि संधि-कालीं
लेइ कुंकुम सति शोभिवंत भालीं
पति-प्रेमीं बहु दंग दिसे झाली
दर्शनोत्सुकता स्पष्ट हो कपोलीं !

घेइ परि जों रवि उडी सागरांत
रजनि-मोहें तम पसरि झणीं हात
हास्य भेसुर भय भासवी क्षणांत
असुर-स्मरणें हो विरस वस्तु-जात !

क्षांत रमणी परि प्रार्थि वल्लभातें
नेत्र मिटुनी मनिं स्मरत इंदु-भा ते
प्रेम-दृष्टी जों निरखि पूर्व-भागीं
अहा ! शीतल भा उसळली हिमांगी !

सुचवि चंद्रोदय दूति तत्सखींतें
हास्य विलसे मधु वदनिं दृष्टि-पातें
नयन उत्सुक पति-दर्शना प्रियेचे
वदन लज्जित, शर हृदयिं मन्मथाचे !

धीर धरवेना—रमण-रूप देखे
प्रीति-बिजली झणिं रोमरोमिं फांके
दृष्टि-मीलनिं सुख एकमेक घेती
प्रेम-निर्झर-जळ अतुळ सेविताती ! !

१५ नोव्हेंबर १९२९

———

## १६ दिवंगत मातुलास*— ( केशवकरणी)

—१—

क्षणहि मिळे एकान्त मनाला मूर्ती तव बावरे—
सभोंवतिं, शोकें मन नावरे

जन-व्यवहारीं गुंतल्या जिवा अल्प विसांवा मिळे
तव स्मृति क्षणांत हृदयीं खिळे !

व्यवसायीं दिन जाई, रातीं अंग टाकितां झणीं
जागतें मानस तव चिंतनीं

स्वप्नीं भाषण श्रवण होतसे, सहवासा सेवितों
अहह ! परि जाणिविनें दचकतों !

—२—

अंतकालचें चित्र चक्षुंना दिसतां मन घाबरे
पद-तलीं धरणी झणिं हादरे

अजाण अबला समीप जमल्या केला कोलाहल
तयां मी शमवाया हतबल

* श्रीयुत के० नारायण काळे यांची ' दिवंगत बंधूस ' ही कविता वाचून.

प्रिय पत्नीच्या हंबरड्यानें उरांत धडकी भरे
देखतां हृदया पडती घरे

अज्ञ कन्यका 'दादा दादा' बाही आर्त स्वरें
कशी तुज काळ-झोंप रुचत रे !

—३—

ज्ञान-वायुनें समीप दिसला मृत्यू दो दिन तुला
म्हणुनि का नेत्रीं धरिसी जला !

भगिनी-सुत बहु विश्वासाचे म्हणुनि हेतु धरियला
अम्हां तो मान्य असे मातुला !

पिकल्या माता-पित्या एकला कुलदीपक तूं सुत
टाकिसी सुपुत्र-विरहाग्नित

अकाल घाला दारुण आला शोक होय अंतरीं
मनाला शांतता न पळभरी !

—४—

पितृतुल्य वात्सल्य दाविलें, पालन केलें स्वयें
नच कधीं कठोर ताडण दिलें

नेणत चुकुनी प्रमाद घडले पदोपदीं अगणित
कथियलें मृदु शब्दें परि हित

कष्ट सोसुनी स्वयें दाविले हे दिन मज अर्भका
होइना स्मरण कसें बालका !

नश्वर तव तनु नष्ट जहाली पंचमहाभूतिं ती
परि हृदीं नांदे अक्षय स्मृति !

—५—

विवाद-पटुता, स्वाभिमान तव रोमरोमिं नाचला
अहह ! तो अवचित लय पावला

स्पष्टोक्तीनें मित्रहि शत्रू ठरले—नच मानिलें
प्रभावें स्वमता आचारिलें

रम्य मनोरे मनीं कल्पिले – कृतांत आल्याविणें
हरपलें अकस्मात तव जिणें !

विपदीं झगडुनि दीर्घोद्योगें आशा-तरु शिंपिला
फलाचा हेतु मनीं राहिला !

‘ ललाट-लेखा कसें परतवे ? जा शोका विसरुनी ’
सांगणें सोपें समजावुनी

‘ ऋणानुबंधीं जीव बांधिले—भोक्तृत्वा भोगणें ’
सुकर हें वाटे उपदेशणें

‘ ब्रह्मीं आत्मा विलीन झाला—चिदानंदिं रमतसे ’
दुज्याला वदण्या हें सुचतसे

प्रसंग पडतां युक्ति-वाद वा वेदांतहि ना पटे
हृदय चिर आप्त-वियोगें फुटे !

६ एप्रील १९३०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्र
अनुक्रम.............. दि: ..........
......... ...........

## १७ हा शुद्ध वेडेपणा ! (सुनीत)

बाला कोमल, नेत्र चंचल, मुखीं हास्य-प्रभा फांकली
गेली गुंगुनि बाहुली नटवितां, नादीं मुदें रंगली
चिंध्यांचीं वसनें अमोलिक गणी, खोटे मणी—माणिक
अंगाई जड बाहुलीस करितां बाला बने भाविक !

होता तात तिचा सवेंच—बरवी मृण्मूर्ति कोरीतसे
ख्याती चित्रकला-प्रवीण जगतीं—मातींत मूर्ती दिसे
नाना रंग भरूनि चित्र संजवी—वस्त्रें, वपू, भूषणें
निर्मी रंग-छटा भरूनि, न गमे कौशल्य कांहीं उणें.

होतां चित्र पुरें मनास रुचलें, आनंद पावे मनीं
झाला जागृत स्वाभिमान—सहजीं देखे सुता लोचनीं
"शृंगारी जड बाहुलीस" वदला, "छांदिष्ट वेडी सुता"
मृण्मूर्ती परि रेखितां न उमजे तो पात्र दोषा स्वतां !

* * * *

बालें, अज्ञ, रसज्ञ, प्रौढ करिती सम्यक् कृती रंजना
अन्यां दोषुनि मीच श्रेष्ठ म्हणणें हा शुद्ध वेडेपणा !

४ जून १९३०

## १८ दीपावली ! ( सुनीत )

होई मोद अपार बाल-सुहृदां दीपावली पाततां
कीं विद्यालय-मुक्त छात्र मिळवी खेळावया स्वैरता
वाटे तोष असीम प्रेमि युवका येतां गृहीं तत्सखी
वृद्धां कौतुक होय अंतरिं मुलें देखोनि सारीं सुखी.

जाती सर्व स्त्रिया गढूनि करण्या दीपावली साजरी
नाना खाद्य-पदार्थ सिद्ध करण्या चापल्य ये सत्वरीं
वस्त्रें नूतन घ्यावया स्फुरतसे उत्कंठता तत्क्षणीं
भावातें भगिनी वदे, ' भरजरी घेईन ओवाळणी !'

मेघें पूर्ण कृपा करूनि दिधलें समृद्ध धान्या जळा
षण्मासीं झिजवी कृषीवल तनू – आमोद त्या लाभला
आदा-खर्च गणी वणिग्जन करी श्री-शारदा-पूजना
मांगल्या प्रसवे निसर्ग-जननी—आल्हाद देई जनां.

* * * *

चाले हा सण भारतीं बहु जनीं वर्षानुवर्षें,–तरी
केव्हां संपुनि पारतंत्र्य अमुचें लाभे 'दिवाळी'खरी !

१३ आक्टोबर १९३०

## १९ पदवीधर गुलाम ! (गज्जल)

सोसुनी कष्ट एक तप मिळविला दाखला उच्च
मानसीं पावला मोद—जगाला लेखिलें तुच्छ
सरस्वती अंकिता झाली—लीलया होय वश लक्ष्मी
कशाची वाण या जगतीं—भराऱ्या मारिल्या नामी !

निघे दिग्विजय साधाया—मिळविण्या वाङ्मयीं कीर्ती
लेखना घेतलें हातीं—स्तुतीला पूर ये जगतीं
मत्सरा पावली लक्ष्मी—होइना उदर-पूर्तीही
बाणलें पूर्ण नैराश्य—लोपला मान लवलाहीं !

लिहूनी अर्ज लीनत्वें कचेऱ्या धुंडिल्या बहुत
कथावे काय अनुभव ते—स्मरणींही हृदय हो गलित
'जी हुजुर् दास्य-वृत्ति' जनीं घेतसे मोल मानाचें
भावना, सत्य, अभिरुचि यां मुकतसे हृदय दासाचें !

कशाचें हृदय दासाला !—जळतसे दास्य पत्करितां
उसासे सोडि अपमान-व्रणानें हृदय बहु सलतां
खादलें अन्न वा शय्या रुचेना—मन भ्रमे विपदीं
लागती नेत्र स्वातंत्र्यीं—प्रेत उच्छ्वास घेइ हृदीं

वरिष्ठें तीक्ष्ण वाग्बाणें छेडिलें मान-धन तरुणा
पोळलें हृदय वदलें नापसंती शब्द एक उणा
अतिक्रम जाहला मानी अधिपती—तोडिलें अन्न
सेवका न्याय कसला?—वाक्प्रहारीं जाइ तज्जन्म!

असह्यें मर्मभेदि वचें जाहला भ्रांत उन्माद
अजस्रा वेगवति चुरडी शरीरा चालतां पंथ
'अरेरे!' पांथ बहु वदले; 'अहाहा! लाभला स्वर्ग'
वदे, 'लाचार आयु सरे, लाधला मुक्तिचा मार्ग!'

*　　*　　*　　*

गुलामी पाश तोडाया जहाले युवक सिद्ध किती
जिवाचें मोल स्वातंत्र्या देउनी ध्येय आचरिती!
सांडलें रुधिर स्पष्ट करी काळिमा पार-तंत्र्याचा
रक्तिमा चलन दे तरुणा—दावि स्वातंत्र्य-पथ साचा!

६ डिसेंबर १९३०

---

## २० नोकरी ! (श्रीरंग)

नोकरी खरोखर सुरी
बोंचुनी उरीं करी हैराण
गमत ती मानसीं पूर्व-जन्म-वैरीण !

परतंत्र जिणें हें व्यर्थ
विनास्वातंत्र्य जगविणें प्राण
जगिं जिवंत मुडद्यां गमे काय अजि वाण !

हतवीर्य होइना कार्य
बळी घे क्रौर्य सलतसे बाण
अपमान-शल्य हृदिं करि सर्वांवरि ताण !

नैराश्य दिसतसे स्पष्ट
असह्यचि दृश्य गुंतली मान
पर-दास्यीं ऐशा मनुजा कसला मान !

हतबला कराया छला
कपीसम खला येत अवसान
अधिकार-मदें तो होई बहु बेभान !

इतिहास    करी उपहास
देखतां दास्य    विचारी प्रश्न
' पारतंत्र्यि तुजला रुचतें कैसें अन्न ? '

भारता    दे स्वतंत्रता
विनाति अच्युता    दुरित करिं चूर्ण
स्वातंत्र्य भारता लाभो झणिं संपूर्ण !

२० जानेवारी १९३१

स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........

---

## २१ दीप-विसर्जन ! (केशवकरणी)

—१—

प्रेमदेवता श्वशुर-गृहीं बहुमास—प्रेमिं रंगला
कवी तिज उत्सुक भेटायला

मूर्ति प्रियेची मनीं आणुनी कितीक काव्यें लिही
—तयांनीं भरली सारी वही

'उद्यानीं,' 'पुष्पास,' 'मदन-शर,' 'तरुणी,' 'गजरा,' 'फणी'
'प्रियेला,' 'स्वप्न,' 'सदन,' 'रूपिणी'

किती कथावे काव्य-विषय ते रोज नव्या कल्पना
कवीच्या कशा कळति भावना !

—२—

उणें न कांहीं कल्पनेंत, नच वाण रूप-सद्गुणीं
कशाची कमतरता लेखनीं !

उच्च भराऱ्या, स्वैर कल्पना, आकर्षण शीर्षकीं
भाव नव कविते ये मासिकीं

बोल लेखनीं, बोलच वचनीं, देणें घेणें नसे
प्रसिद्धी नांवाची होतसे !

कल्पकता-सम्राट, वाणिचा कुबेर, प्रतिभा-रवी
स्तुतीला भुलला भोळा कवी !

—३—

गृहीं पाततां कान्ता, कविता वाचुनि दावी कवी
येइ तत्स्फूर्तीसि नव पालवी

उत्प्रेक्षा, यति, यमकें, उपमा देतां समजावुनी
धन्यता वाटे कविच्या मनीं

प्रसंग, उद्भव, हेतु, कल्पना, मर्म शब्द-योजना—
—विवरणीं मूढ बने अंगना

अज्ञ प्रेमला—कवयित्रि न जरि—कविची रमणी परी
चाखण्या शक्त काव्य-माधुरी !

—४—

काव्यानंदीं दंग कवि तया काळाचें भान ना
अहर्निश मनीं काव्य-कल्पना

वेला-यंत्रें अकरा टोले दिले – पाहि सहचरी
जाहली सिद्ध उठाया, परी—

कवि बहु आतुर ओष्ठ-चुंबना– धरिला कर झडकरी
दाटलें काव्य-प्रेम अंतरीं !

देइ मान्यता तन्मय होउनि काव्य-स्फूर्ति कामिनी
करितसे 'दीप-विसर्जन' क्षणीं ! !

२५ जानेवारी १९३१

---

## २२ पहिला पाऊस ! ( गज्जल )

कडाडे व्योमिं झणिं बिजली–चकाके तेज लखलखित
तुफानीं मातला दर्या, धुळीनें माखला मरुत
नभींची मेघ-पंक्ति धरी क्षणार्धीं रौद्र–रूपांला
धजावे मन न भय-कर ते क्षणिक तद्वेष बघण्याला !

गमे ती वेळ प्रळयींची — खलाशी सोडि आशेला
गिळिल दर्या क्षणीं उदरीं — भयानें दिसत मेलेला
वनीं पांथस्थ पथ चुकला—जिवाची ना तया आशा
कधीं मोडेल वृक्ष शिरीं—कधीं करि वीज निजनाशा !

बहु तपें देह झिजवूनी वृक्ष-मुनि सिद्ध अन्यार्था
सदा शीतोष्ण-वात-जला साहुनी देति सुख पांथा
किती खग कोटरीं वसले, बहु जनां लाभली छाया
कटि-शिरीं खेळती लतिका – समय ये सांडण्या काया !

नभीं खग स्वैरगति उडतां थरारे भीतिनें हृदयीं
अरण्यीं हिंस्र पशु दडती कंदरीं भिउनि त्या समयीं
वनींचे गोप घाबरती देखुनी स्वैर गो-वत्सां
कृषीवल बावरा होई – मशागत अंतरे शेता !

कडे घेऊनि तान्ह्याला जातसे राउळीं वनिता
घेउनी कुंभ कटिं कोणी गांठिते जलदिनें सरिता
परी निजकार्य सोडोनी शोधि आधार हर-प्राणी
भीतिनें वस्तु-जात दिसे संकुचित—थांबली वाणी !

* * * *

अहा ! परि जलद जलदीनें करी पर्जन्य-वृष्टीला
भरे चैतन्य दाहि दिशां येत उल्हास सृष्टीला
लता तरु मलुल दिसल्या त्या होत झाणिं दंग आनंदीं
दुणावे मोद, मनिं रंगे चराचर आपुल्या छंदीं !

कराया स्पर्श नेत्रांना जिथें जल ना मिळे पूर्वीं
न जाऊं देति पर-तीरा नद-नद्या—वाहती गर्वीं
प्रभू क्षणिं राव करि रंका, दुर्बला प्रबल लवलाहीं
तयाची साक्ष पर्जन्यें पटविली—अखिल जन पाही !

* * * *

वस्तुचें मोल ना करणें सौम्य वा रौद्र बाह्यांगीं
धरावा मोद ना लाभीं, न दुःखा ठाव सुख-त्यागीं
चलाचल वस्तु-रूपानें दावि सामर्थ्य प्रभु अपुलें
तयाचें कार्य-कारण-गूढ मनुजें पाहणें वहिलें !

२० एप्रील १९३१

## २३ अनुकरण

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलमान. अनुक्रम ४९०५३ दि: ... ९८८३

(गज्जल)

जन्म जगिं पावतां नयनां उघडिना अज्ञ शिशु लवही
' कुठें मी ?' 'काय जग ?' याची तया ना कल्पना अणुही
तन्मुखा पाहुनि हंसतां लावि टक त्या मुखीं– हांसे
धडा हा घेइ अनुकरणें बाल अज्ञान स्पष्ट दिसे !

करी बहु कर-पदीं चाळे – निसर्गे झोंप कधिं घेई
रांगतां चालतां वदतां करी अनुकरण त्या समयीं
बोबडे बोल बोलाया बालका जननि जे शिकवी
ते तसे बाल अनुकरणें वदतसे--रीत ही न नवी !

अनुकरी तात-मातृ-कृती — हिताहित ना मनीं धरित
संवगडी करिति केलि तशा अहेतुक आचरी बहुत
जशी गुरु शिकवि 'श्री' गिरवी—धरी विश्वास तद्वचनीं
कुतूहल दडपुनी हृदयीं करी अनुकरण बाल झणीं !

* * * *

असो शास्त्रज्ञ, तत्वज्ञ, कलावान्, नवमताचारी
अनुसरी भूतकाल तरी भविष्यीं प्रगति हितकारी
व्यास-कृति-कल्पना रचिती वाङ्मयीं शारदा-तिलक
कळेना अल्प अनुकरणीं कवि कसा होइ शर्विलक !

१ मे १९३१

## २४ वाळूचा देव ! ( चंद्रकांत )

वसंत-काळीं संध्यासमयीं सिन्धु–तीरिं जावें
मनासि गमलें—पद पथ धरिती त्या दिशे स्वभावें.

झुळुक वायुची मोद दे मना—क्षणांत श्रम हरवी
जमती बहु स्त्री-पुरुष-बालकें सूर्यास्तापूर्वी.

उल्हासित निष्कपटी बालें स्वैर केलि करिती
देव-देवता देवालयिं तीं वाळूमय रचिती !

इथें तिथें वाळुका चहुंकडे – सागरिं जल जैसें
गृह बांधाया काष्ठ, लोह नच – वाळू विपुल दिसे;

देव वाळुचे, फुलें वाळुचीं, नैवेद्यहि वाळू
दुजाभाव विसरुनी रंगली प्रभु-पदिं बाल-चमू !

अजाण बालीं तन्मयता बहु रमतां खेळांत
काव्य कवींचें निष्प्रभ त्यांच्या समरस-वृत्तींत !

तिमिर पाततां गृहा जावया पिता तयां बाही
‘ रक्षिल देवा कोण ? ’ काळजी बाल-मना दाही !

प्रश्ना हंसतां त्वरित लाजलीं निर्विकार बाळें
अहंपणें तच्छुद्ध-भावने व्यर्थ दूषवीलें

पश्चात्तापाग्निनें पोळलें अविवेकी हृदय
बाळ-प्रश्न-उपहास जाहला कर्ण-नेत्र-विषय !

८ ऑगष्ट १९३१

---

## २५ माझा ताप ! (शा. वि.)

आला ताप असेल मामुलि तयीं दुर्लक्ष केलें जरा
' हा दोषी ज्वर ' तज्ज्ञ वैद्य नलिका लावोनि बोले उरा
अन्ना वर्ज्य करूनि पेय दिधलें, नाना दिलीं औषधें
शौचा देउनि बस्ति-यंत्र ' गुण ये आठा दिशीं ' तो वदे.

नाना व्याधि-विकार-पीडित चमू येतां चिकित्सालयीं
विद्यालंकृत वैद्यराज समरीं योद्धा गमे अक्षयीं
एका दे ज्वर-मापकासि, नलिका लावी दुज्याच्या हृदीं
' जिव्हा पाहुं ' वदे तिज्यास, चवथ्या 'देतों' म्हणे 'औषधी;'

येतां पंचम प्रस्थ त्या अवसरीं—उत्थापना त्याजला
द्याया तो नच विस्मरे—'सुदिन हा ' बोले मनीं 'लाभला !'
देखोनी व्यवहार मानस हंसे – ना देह पावे सुखा
ना आल्हाद मना, न शक्ति शरीरा—झाला बिछाना सखा !

इच्छा अंतरिं आस, मित्र बघण्या येतील माझ्या घरीं
जोशी, सोमण, पंत, विष्णु, बरवे, बापू, सदोबा, हरी
वेलायंत्रि प्रभातिं सात दिसतां आशा मनीं पालवे
ती निद्रा-समयीं दहा बघुनियां नैराश्यभारें लवे !

'हें माझें' 'मम मित्र' 'आप्त निज हे' सौख्यांत भासे खरें
आपत्कालिं कळे जगीं असति का कोणी सगेसोयरे
जो तो मग्न अहर्निशीं निजसुखीं– अन्यार्थ त्या वेळ ना
हा सिद्धांत ठसावया मम ज्वरा दैवें दिली प्रेरणा !

सौख्यामागुनि दुःख,–क्लेश सरतां आनंद वाटे जनां
होतों सुदृढ, रुग्ण होय – परि ये उल्हास आतां मना
'देणें वा दुखणें कुणास न रुचे !' हें बोलती लौकिकीं
व्हाया अक्षय तत्त्व-लाभ, धरण्या त्यां सिद्ध मी मस्तकीं !

३१ ऑगष्ट १९३२

ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
नं. नं.
ता.
ग्रंथ संग्रहालय
१५८६२
(स्थळ प्रत)

## २६ पत्र आलें, पण— ( दिंडी )

वृत्त कळलें ना बहुत दिन सखे ! गे
चित्त माझें बावरे अति शुभांगे !
कर्ण उत्सुक तव क्षेम परिसण्याला
नेत्र आतुर तव पत्र वाचण्याला !

पत्रिकेस्तव दिन आठ वाट पाहीं
परि न मिळतां ती हृदय विवश होई
काळ कैसा कंठिला ?—काय लेखूं !
अशा समयीं मन शांत कसें राखूं ?

प्रेम-वेडा मी—करिति मित्र थट्टा
होइ अस्थिर मन – येइ पत्र हस्ता
तया एकान्तीं वाचण्या त्वरेनें
घेइं – वदती ते " पत्र पहा आलें ! "

एक मागें ये—हळुच पाहि पत्र
दुजा घ्याया तें करी यत्न तत्र
तिजा कौशल्यें उडवि भूवरी तें
वदति, " पाहुं सखी काय लिहि पतीतें !"

राग-अनुरागें चुरस-समय आला
सुहृदं-कोपाचि पत्रिकेवरि निघाला
वाचल्याविण फाडिली—कोण मूर्ख ?
—मित्र, मी, तूं वा क्षणिक मन-क्षोभ ?

* * *

भान येतां वाटलें पत्र वाचूं
चिटोरे ते लागले त्वरित नाचूं
अतुल इच्छा जरि पत्र-वाचनाची
कशी पुरवूं ती या क्षणीं मनाची !

२५ आक्टोबर १९३२

सं. ........ नं. ........
ता. ........
ठाणे.

—

## २७ कला-पूर्ति ! (केशवकरणी)

—१—

नभीं दीप जणुं चंद्र चांदण्या निशा-समयिं चमकती
न त्यांची दीप-गृह धरि क्षिती,

रंगछटांनीं सुंदर उपवन चित्रकार रेखितो
परी त्या माळी नच मानितो,

गाउनि कवि बहु सुस्वर काव्यें देत जनां चेतना
तयाची महती ना पिक-मना,

नाट्य-निपुण नट ललनाभिनयें करी रसिक-रंजना
रुचेना कृति तद्रमणी-मना !

—२—

रणबाजींची युद्ध-कुशलता — वाक्पटुता पंडिता
परस्पर-कार्यीं ये का हिता ?

लेखक निर्मी लेखन बरवें – कृषिक धान्य-निर्मिता
परी नच उभय जनीं साम्यता,

कला-कुशल निजकला समगुणी अनभिज्ञा दावितां
अवज्ञा-प्रसंग ये उभयतां;

रसिक-रसज्ञ-द्वय-संगें ये कलेस बहु मान्यता
तयें हो 'कला-पूर्ति' तत्वतां !

२९ आक्टोबर १९३२

---

## २७ कला-पूर्ति ! ( केशवकरणी )

—१—

नभीं दीप जणुं चंद्र चांदण्या निशा-समयिं चमकती
न त्यांची दीप-गृह धरि क्षिती,

रंगछटांनीं सुंदर उपवन चित्रकार रेखितो
परी त्या माळी नच मानितो,

गाउनि कवि बहु सुस्वर काव्यें देत जनां चेतना
तयाची महती ना पिक-मना,

नाट्य-निपुण नट ललनाभिनयें करी रसिक-रंजना
रुचेना कृति तद्रमणी–मना !

—२—

रणबाजीची युद्ध-कुशलता — वाक्पटुता पंडिता
परस्पर-कार्यीं ये का हिता ?

लेखक निर्मी लेखन बरवें – कृषिक धान्य-निर्मिता
परी नच उभय जनीं साम्यता,

कला-कुशल निजकला समगुणी अनभिज्ञा दावितां
अवज्ञा-प्रसंग ये उभयतां;

रसिक-रसज्ञ-द्वय-संगें ये कलेस बहु मान्यता
तयें हो 'कला-पूर्ति' तत्वतां !

२९ आक्टोबर १९३२

---

## २८ कोंकण ! ( अंकूर )

मी कोंकणचा—कोंकणचा अभिमान
नसनसांत भरला जाण !

नर-रत्नांची कोंकण अखंड खाण
नच त्यांतें तेथें वाण.

किति रत्नांची काव्यीं ओवूं माळ ?
तयिं कौस्तुभ टिळकचि बाळ !

किति मोत्यांचे शिंपे मिटले उघडे
गणतीहि तयांची न घडे !

मम कोंकणचें निसर्ग-वैभव थोर
निर्मि सह्य सागर-तीर !

नव सृष्टीची पुरुष-स्त्रीची जोडी
नारळ-पोफळिची वाडी;

अळु, करवंदें, काजू, आंबे, फणस
कोंकणचा मेवा खास.

मम कोंकण ना ऐदि जनांचें स्थान
उद्यमेंच त्या जनिं मान !

किति कोंकणचे सद्गुण गावूं आतां
जन्म-भूमि नमितों माथा !

५ नोव्हेंबर १९३२

---

## २९ विरह-पूर्ति ! ( दिंडी )

जरि न दर्शन तव प्रिये ! बहुत मास
विसर ना हो मज एक दिनहि खास
मनीं चिंतन करिं क्षणहि स्तब्ध होतां
मधुर भाषण तव सुखवि स्वप्निं चित्ता !

वास शरिरें जरि दूर सखे ! होई
भास हृदयीं कीं उभय एकदेही
प्रेम-रज्जू क्षिति करि न अंतराची
गुंफि माला ती प्रणयि अंतरांची !

* * * *

सूर्य-दर्शन दे मोद कमलिनीतें
मेघ-दर्शनिं औत्सुक्य चातकातें
उदधि चंद्रोदयिं उचंबळे वेगें
अल्प तापें हिम-नगहि वितळुं लागे !

प्रेम-बिजली जणुं संचरे निजांगीं
फोल भाषा ना उचित या प्रसंगीं
विरह-वन्हीनें हृदय विकल होई
शांतवाया त्या संग-सुधा देई !

२४ डिसेंबर १९३२

## ३० अट्टाहास ! (केशवकरणी)

वस्त्र टाकुनी कांट्यांवरि तें जलदीनें ओढणें
कंटकीं अनवाणी चालणें

तुफान दर्यामाजी नौका हेक्यानें लोटणें
खळाळ्या जळीं उडी घालणें

मृगजळ जाणुनि तृषा हराया तनू व्यर्थ शिणविणें
अग्निवरि बळेंच पद टाकणें

नयन झांकुनी मार्ग चालणें, खडकीं बीं पेरणें
ऋणानें सण सादर करविणें

निज बलाबलाचा विचार केल्याविणें
जरि स्तुतीस हुरळुनि पर-बुद्धी मानणें
मग अपयश येतां अन्या कां दोषणें ?

अट्टाहासें अदूरदर्शी अव्यवहारी ठरे
अपयशीं पश्चात्तापें झुरे !

१६ जुलई १९३३

—–—

## ३१ दे॰ विठ्ठलभाई पटेल यांस— (गीति)

विधि-मंडळीं दरारा दावुनि अजरामरत्व मेळविलें
जन-सेवा निःस्वार्थी करुनि स्वदेशा अखंड भूषविलें !

पटलें बुद्धि-सुवैभव, भविष्य-वाणी नको पटेल अशी
टेम्भा विरोधकांचा लोपे—तम जेविं उगवतांच शशी !

लक्ष जसें जननीचें निज-बालीं दूर अंतरीं वसतां
प्रकर्ष हिंद जनांचा व्हाया झटसी विदेशींही असतां;

तन-मन-धन स्वदेशा अर्पुनि निरपेक्ष प्रेम-बुद्धीनें
नश्वर देहा त्यागुनि, केली चिर कीर्ति देश-भक्तीनें !

मनिं तूं चिरायु व्हावें—परि काळाची गमे विचित्र मती
नमुनी भावें प्रभुला प्रार्थितसें लाभण्या तुला सुगती.

अकाल-निधनीं झालें भारत-भूचें असह्य अहित गमे
सोदाहरणें पटलें—भरण्या तव स्थान कल्पना न रमे !

२ नोव्हेंबर १९३३

## ३२ तत्त्वनिष्ठा !

( केशवकरणी )

सापत्न-मदें लत्ता बसतां स्वाभिमान चेतला
सान ध्रुव अढळ-पदीं बैसला,

हरिनामास्तव प्रल्हादानें जनकहि ना मानिला
भक्तिनें हरि त्या वश जाहला,

' सावधान ' मंडपीं ऐकतां नारायण उमजला
राष्ट्र-हितिं रामदास गाजला,

परवशतेची चीड येउनी पित्राज्ञा मोडिली
हिंदुपदशाहि शिवें स्थापिली;

श्रेष्ठता मिळविण्या उमेद हार्दिं नाचतां
नरशार्दुल न धरी परंपरेच्या पथा
स्वावलंबन तया यशद मार्ग तत्त्वतां;

वडिलाज्ञेचें बुजगबाहुलें ध्येय-च्युत करि नरा
आत्म-विश्वास न जरि अंतरा !

६ मार्च १९३४

———

## ३३ दगडाचें देवपण ! (शा. वि.)

*"I am a Pebble ! and yield to none !"*
*Were the swelling words of a tiny stone—*

—*H. Gould*

धोंडा एक वदे, " पुरातन बहू मी लीन ना हो कुणा
झालीं फार युगें मला उपजुनी ठावें न का आपणां ?
जाणेना मम जन्म-काल कुणिही कोठें, कधीं वा कसा
नाहीं एकहि शक्त भूमि-तालीं या सांगे कथा ही असा !

गारा, वायु, शशी, न मेघ शकती आणावया मार्दव
वा चंडांशुहि ना समर्थ मजला भेदावया हो लव
आहें मी सकलां अजिंक्य तरि कां ना स्वाभिमाना धरूं ?
मी प्राचीन, पुराण, थोर असतां श्रेष्ठत्व कां विस्मरूं ?

झाडें, वेलि, फुलें अशाश्वत जगीं—पक्षी पशूही तसे
केव्हां जन्म तयांस अंत कधिं हो त्या कल्पनाही नसे
घेवोनी जनना मनुष्य मरती, घेती पुन्हां जन्मही
चाले हा क्रम, खंड ना—जलमयी होईल जों ही मही !

...ग्रंथ संग्रहालय, ... दि: ...
अनुक्रम...

कष्टां साहुनियां ऋषी मुनि तपश्चर्या करीती तथां
मार्गीं दुर्धर क्लेश त्यांस पडती सद्ध्येय लाधावया
कित्येकां यश येइ सत्वर, परी कांहीं पथीं त्यागिती
यत्नांवांचुनि मृत्यु मी दवडिला—कौशल्य माझें किती !

•

वाटे ही परमेश्वरीच करणी जों जों मना वासना
तों तों हृद्गत ध्येय दूर पळतें—तत्सिद्धितें वास ना;
जो हव्यास धरी न, त्यास सहजीं लाधे सुदैवें पहा
पावें मी अजरामरत्व जगतीं—झाली अशी ही तऱ्हा !"

ऐसें बोलुनि गर्व-मूर्ति खळ तो उन्मत्त होई झणीं
तुच्छी दाहि दिशा, चराचर तशा वस्तूंस साऱ्या मनीं
देखे आम्र-फला तदा सहज तो, दावी तया तुच्छता
बोले गर्वभरें कठोर वचनें—ना लेश त्या नम्रता.

" धोंडोपंत प्रसिद्ध नाम मम हें विख्यात साऱ्या जनीं
ना ठावें अमरत्व का मम तुला ? आलास तूं कोठुनी ?
ऐकूं दे तव नाम, धाम; जनना कोठें कधीं पावसी ?
येण्या या स्थलिं काय कारण तुला ? येथें कसा पातसी ?

माझी कीर्ति कुठें! कुठें तव! मुळीं ना साम्य दोघांत कीं
माझें आयु किती—तया न गणती, झालों चिरंजीव मी
तूं अल्पायु, कृतांत-काळ तुजला भक्षी कदा ना कळे
थोरांचा सहवास इष्ट न तुला—हें ही कसें नाकळे!"

गर्वोक्ती परिसूनि आम्र-सुहृदा होती बहू यातना
होई स्तब्ध तदा—पुन्हां दचकुनी लज्जा छळी तन्मना
होते आप्त सुजाण त्या निज-गृहीं हें दैव वाटे भलें
पुण्याचा क्षय होय—पातक जणूं त्याच्यापुढें ठाकलें!

"द्यावें उत्तर रोकडें" मनिं म्हणे,—ती ना रुचे कल्पना,
निर्धारूनि म्हणे, "कठोर वदुनी कां देवुं त्या वेदना
मातें दुस्सह शब्द अन्य वदतां पीडा मना होतसे
तैसें मी वदतां तयास सहजीं ना दुःख होई कसें!

नम्रत्वें सुजनत्व शोभत असे—दे लीनता श्रेष्ठता
दुष्टाचे अपकार साधु न गणी—चिंती सदा तद्धिता!
क्रोधें क्रोध शमे न, नम्र वचनें येई खळा मार्दव
पश्चात्तापिं तया विवेक करण्या सद्बुद्धि दे माधव."

तो बोले, " मम नाम आम्र-फल, हो मज्जन्म उच्च स्थलीं
होतां पक्क तिथें परार्थ हृदयीं उत्कंठता लागली
व्हावें धन्य परोपकार करुनी इच्छा स्फुरे अंतरीं
आलों मार्ग चुकूनि मी परि इथें—ही भूल होई खरी.

मृत्यू, जन्म, जरा, विनाश न कधीं ज्या स्वप्निंही ठाउकें
ऐशा थोर विभूतिसन्निध दिसे येणें खरें वाउगें
झाला दोष न आणितां मनिं, क्षमा मातें करा आपण
दोषांचे परिमार्जना नमुनि मी घेईन लोटांगण ! "

उद्गारूनि विनम्र शब्द अपुल्या शीर्षें नमी तत्पदां
देहा सत्वर तो धुळींत दडवी—अदृश्य होई तदा
लाधे त्या स्थलिं त्यास सौख्य अथवा हो दुःख–कैसें कळे?
वाटे मोद, विषाद वा विकलता धोंड्यासि हें ना कळे.

* * * *

थोडेसे दिन लोटल्यावरि अहा ! भेदूनि आच्छादना
रोपा सुन्दर येतसे वरि – गमे सौंदर्य लाभे वना
आम्राचेंच असेल संक्रमण वा अव्यक्त शक्ती वसे
पाषाणा नच कल्पना – उकलण्या गूढ क्षिती त्या नसे.

जातां काल रसाल-वृक्ष सहजीं विस्तार पावे, अहा!
वाढे उंच तशा विशाल दिसती शाखा तयाच्या महा
येतां काल वसंत त्या अवसरीं येई तया मोहर
होतां थोर फळें सुपक्व मधु, त्यां येई रसाचा भर.

पक्ष्यांचा समुदाय मोहित दिसे चाखावया त्यां सदा
येती जीव लहान थोरहि तिथें देखूनि त्या सौख्यदा
वाटे विस्मय दृश्य देखुनि तदा पाषाणपंता, परी–
होई लज्जित मानसीं बघुनियां रूपांतरा सत्वरीं.

"आम्रा!" पंत वदे, "हृदीं विनय हा नांदे किती– ना मिती
नाहीं दर्शविलें महत्त्व लवही – नम्रत्व वानूं किती!
त्या अत्यल्प फळांत दिव्य महिमा सांठे न हो कल्पना
ऐशी गुप्त अमूल्य सत्कृति न दे आश्चर्य कैसें मना!

अंगीं श्रेष्ठ प्रभाव नित्य वसतां ना गर्व केला कदा
त्यां मूढें वदुनी कठोर वचनें तुम्हां दिली आपदा;
केला वास धुळींत साहुनि जरी निंदापमाना तदा
भूमाता करि सिद्ध 'मी न लपवीं त्या योग्य जो सत्पदा!'

पक्षी, मानव, सान, थोर दिसती उत्कंठ पुष्पां-फळां–
सेवाया, रस-माधुरी निशिदिनीं आमोद दे त्यांजला
तुम्हां वानिति सर्व, कोणि न बघे माझ्याकडे – योग्य तें
पश्चात्ताप-व्यथा मना शिणविते—ना जाणिलें योग्यतें."

ऐकूनी अनुतापयुक्त वचना धोंड्यासि आंबा म्हणे,
" मी ना पात्र स्तुतीस—युक्त न गमे मातें स्तुती ऐकणें
सर्वाधार प्रभू न मी, यश तुम्हां इच्छीं परी अंतरीं
चिंता दीनदयाळ माधव हृदीं—दासासि तो उद्धरी. "

बोले पंत मनीं, " जरी अमर मी – लक्षा न मातें कुणी
आम्राच्या रस-सेवना रसिक हे येती सदा काननीं
येतां ते मम शीर्षही तुडविती—वाटे तयां ना क्षिती
झालों मी उपहास-वस्तु जगतीं—लाधे कशी सद्गती ?

आलस्यीं चिरजीवना उधळिलें, अन्यार्थ ना साधिला
गर्वें तुच्छ गणूनि सद्गुण-निधी म्यां व्यर्थ अव्हेरिला
पश्चात्ताप न शांति दे लव मना—मद्गर्व हो काळिमा
उद्धारीं मज सत्वरीं—तव पदीं दे ठाव सर्वोत्तमा ! "

दुष्टा शासन द्यावया धरि विभू काठिण्य जो अंतरीं
भक्ता तारक तोचि होय कळतां सद्भावना सत्वरीं
जाणूनी अनुताप भक्त-हृदयीं येई दया माधवा
पश्चात्ताप कृतापराधिं न कशी दे मुक्ति पापी जिवा ?

होतां ईश-कृपा उणें न अणुही भक्ता गमे निश्चयें
ये वैगुण्य दया-घना न जरि तो दासास दावी दये;
कारागीर सुविद्य देखुनि प्रभू दे स्फूर्ति त्या कोरण्या
तत्पाषाण-सुमूर्ति, जाणुनि हृदीं तो योग्य उद्धारण्या.

टांकीचे घण बैसतां निजशिरीं धैर्यें तयां साहिलें
पाषाणें निज गर्व सोडुनि अहा ! दिव्यत्व संपादिलें;
होतां मूर्ति पुरी मनास रुचली एका धनाढ्या तदा
स्थापी राउळिं तीस—दर्शन-सुखा घेती मनुष्यें सदा !

* * * *

होता फत्तर — त्या जनीं तुडविलें तेव्हां तिरस्कारुनी
होतां माधव-मूर्ति सर्व नमिती त्या आदरें प्रार्थुनी
अर्पी भक्त सुपक्क आम्र-फल त्या भावें स्तवूनी पदा
वैचित्र्यें नटवी जगा प्रति-पळीं तो ईश प्रार्थूं सदा !

एप्रील १९३४

१०८४३

समाप्त.

REFBK-0017962
REFBK-0017962